# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.07.2025** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाच देशांचा यशस्वी दौरा, नामिबियाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मान
2. पूर्व विभागीय परिषदेची आज गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक
3. चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस 50 हजारपेक्षा अधिक रोजगार देण्याची रेल्वेमंडळाची घोषणा
4. भारत-इंग्लडदरम्यान महिला टी-20 पाच सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघाची विजयी आघाडी

**पंतप्रधान-नामिबिया**

आफ्रिकेकडे केवळ साधनस्रोतांची निर्मिती करणारा म्हणून नव्हे तर मूल्य निर्मिती आणि शाश्वत विकासात नेतृत्व करणारा खंड म्हणून पाहिले पाहिजे. असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नामिबियाच्या संसदेला संबोधित करताना काढले. आफ्रिकन संघाच्या अजेंडा 2063, अंतर्गत औद्योगिकीकरणाच्या उद्दिष्टांना भारताचा मजबूत पाठिंबा असून संरक्षण आणि सुरक्षा यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याच्या भारताच्या वचनबद्ध आहे असा त्यांनी पुनरुच्चार केला. उद्योजकता, आरोग्य आणि डिजिटल सहकार्य याविषयावर काल पंतप्रधानांच्या उपस्थितीत सामंजस्य करार झाले. पंतप्रधानांनी नामिबियाचे संस्थापक जनक डॉ. सॅम नुजोमा यांना आदरांजली वाहिली. देशातील लोकशाही अधिक सखोल करण्यात नामिबिया सरकार आणि जनतेच्या भूमिकेचे मोदींनी कौतुक केले.

अलीकडेच नामिबियाच्या पहिल्या महिला राष्ट्रपतीची निवड केल्याबद्दल मोदींनी कौतुक केलं आणि हा एक ऐतिहासिक क्षण असल्याचं आपल्या संभोधनांत सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाना, त्रिनिदाद आणि टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबिया या पाच देशांचा दौरा यशस्वीरित्या पुर्ण केला असून ते मायदेशी परतत आहेत.

दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, भारत आणि नामिबियानं मोदी यांच्या उपस्थितीत नामिबियामध्ये उद्योजकता विकास केंद्राची स्थापना आणि आरोग्य आणि औषध क्षेत्रातील सहकार्य यासंदर्भात दोन सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. या वर्षाच्या अखेरीस नामिबियामध्ये डिजिटल पेमेंट सिस्टीम सुरू करणं आणि भारताच्या नेतृत्वाखालील आपत्ती निवारक पायाभूत सुविधांसाठी आघाडी आणि जागतिक जैव इंधन आघाडी या जागतिक उपक्रमांमध्ये नामिबियाचा प्रवेश यासारख्या तीन प्रमुख घोषणा देखील या भेटीदरम्यान करण्यात आल्या. आकाशवाणीच्या प्रतिनिधी अपर्णा खुंट यांनी नामिबियातील विंडहोक इथून पाठविलेला हा वृत्तांत...

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नामिबिया दौरा हा त्यांच्या पाच देशांच्या प्रवासातील शेवटचा टप्पा होता जो भारत-नामिबिया द्विपक्षीय संबंधांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरला. जवळपास 30 वर्षांनंतर भारतीय पंतप्रधानांचा नामिबियाला हा पहिलाच दौरा होता. दोन्ही देशांमधील आरोग्यसेवा, यूपीआय सारख्या डिजिटल पेमेंट सिस्टीम आणि कौशल्य विकास यासारख्या क्षेत्रात भागीदारी हे या दौऱ्याचे मोठे यश म्हणता येईल. नामिबियाच्या विकासात भागीदारी वाढविण्या बरोबरच भारताचे आफ्रिकेशी संबंध मजबूत करण्यात या भेटीचे योगदान राहील. दौऱ्यात पंतप्रधान मोदींना नामिबियाचा सर्वोच्च नागरी सन्मान देखील प्रदान करण्यात आला, जो भारत आणि नामिबियामधील वाढत्या विश्वासाचे प्रतीक आहे. एकूणच, ही**

**भेट केवळ द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यापुरती मर्यादित नव्हती तर आरोग्य, तंत्रज्ञान आणि शिक्षण यासारख्या क्षेत्रात एकत्र काम करून भारताच्या "ग्लोबल साउथ" धोरणाला वेग देणारी ठरली. आकाशवाणी बातम्यांसाठी विंडहोकहुन मी अपर्णा खुंट.**

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज रांची इथं 27 व्या पूर्व विभागीय परिषदेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. या बैठकीत झारखंड, बिहार, ओडिशा आणि पश्चिम बंगाल या चार पूर्वेकडील राज्यांतील 70 प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. बिहार, ओडिशा आणि पश्चिम बंगालमधील प्रलंबित आंतरराज्यीय मुद्द्यांवर चर्चा आणि मागील परिषदेच्या बैठकींमध्ये घेतलेल्या निर्णयांवरील प्रगतीचा आढावा घेतला जाईल. राज्य सरकारने 20 हून अधिक मुद्यांची कार्यसूची तयार केली आहे. यामध्ये केंद्र सरकारकडून किमान सव्वा लाख कोटी रुपयांच्या प्रलंबित थकबाकीची मागणीचा समावेश आहे. बिहारसोबत मालमत्ता आणि विविध दायित्वांचं वाटप आणि पश्चिम बंगालसोबत पाणी वाटप या मुद्द्यांवरही बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

**माओवादी**

छत्तीसगडमध्ये, दंतेवाडा जिल्ह्यात बारा माओवाद्यांनी काल पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. यापैकी नऊ माओवाद्यांवर एकंदर अठ्ठावीस लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक गौरव राय यांनी दिली. राज्य सरकारच्या नवीन पुनर्वसन धोरणांतर्गत आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना प्रत्येकी 50 हजार रुपयांचे प्रोत्साहन आणि इतर सुविधा देण्यात येतील. असंही ते म्हणाले.

**निर्मला सीतारमण**

सुशासन, जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहकांच्या हक्कांचं रक्षण करण्यासाठी बिगर-बँकींग वित्तीय कंपन्यांनी अर्थात NBFC ने प्रयत्न करावेत आणि या नितीमुल्यांना आपल्या विश्वासार्हतेचा भाग करण्याची गरज असल्याचं केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी व्यक्त केली. नवी दिल्ली इथं झालेल्या एनबीएफसी परिषदेला त्या संबोधित करताना बोलत होत्या. एनबीएफसी क्षेत्राच्या एकूण अनुत्पादक मालमत्तेत गेल्या मार्च महिन्यात नोंदवलेल्या 6 पुर्णांक 4 टक्क्यांवरुन आतापर्यंत सातत्याने घट झाली आहे. अर्थमंत्र्यांनी असेही नमूद केले की बँकांनी घेतलेल्या कर्जावरील जोखीम भार करणे आणि आर्थिक परिस्थिती सुलभ करणे यासारखे उपाय नियामक संस्थांनी अलिकडच्या काळांत राबवले आहेत. त्यामुळे या क्षेत्रासाठी आर्थिक मजबूतीकरणाची अपेक्षा आहे. एनबीएफसींनी या दरकपातीचे फायदे ग्राहकांना द्यावे असं आवाहन सीतारमण यांनी गैर-बँकींग संस्थांना केलं.

**रेल्वे भरती**

भारतीय रेल्वेने 2025-26 या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत 9 हजारहून अधिक पदांच्या नियुक्तीसाठी अधिसूचना जारी केली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस 50 हजारपेक्षा अधिक नोकऱ्या दिल्या जातील अशी घोषणा रेल्वेकडून करण्यात आली आहे.

**बिहार**

बिहारमध्ये मतदारांचा सक्रिय सहभाग, निवडणूक अधिकारी, स्वयंसेवक आणि केंद्रस्तरीय एजंट यांच्या अथक प्रयत्नांमुळे मतदारयाद्यांच्या विशेष पुनरिक्षणामध्ये 57 टक्क्यांहून अधिक अर्ज जमा झाले असल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. या प्रक्रियेच्या पहिल्या 15 दिवसांत सुमारे साडेचार कोटींहून अधिक अर्ज जमा झाले आहेत. हे काम या महिनाअखेरपर्यंत पूर्ण होण्याचा आयोगाला विश्वास आहे.

**अमेरिका**

आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या अमेरिकन आणि इस्रायली नागरिकांवर खटला चालवण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा दिल्याबद्दल अमेरिकेने संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेच्या विशेष प्रतिनिधी फ्रान्सिस्का अल्बानीज यांच्यावर निर्बंध लादले आहेत.

अशी माहिती अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी दिली. गाझामधील इस्रायलच्या लष्करी कारवायांवर त्यानी  टीका केली होती. त्या पार्श्वभूमीवर अल्बानीज संयुक्त राष्ट्रांच्या भूमिकेत काम करण्यास अयोग्य असल्याचा आरोप त्यांनी केला. या निर्बंधांमुळे त्यांना अमेरिकेत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात येईल आणि त्यांची मालमत्ता गोठवण्यात येईल. इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू वॉशिंग्टनला भेट देत असताना या निर्बंधांची घोषणा करण्यात आली आहे.

**<u>ट्रंप</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्राझील, श्रीलंका, अल्जेरिया, इराक, लिबिया, फिलीपिन्स, मोल्दोव्हा आणि ब्रुनेई या आठ देशांमधून येणाऱ्या वस्तूंच्या आयातींवर नवीन आयातशुल्क आकारण्याची घोषणा केली आहे. हे शुल्क 1 ऑगस्टपासून लागू होतील. ब्राझीलला सर्वाधिक 50 टक्के शुल्क आकारण्यात आले आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी या राष्ट्रांच्या नेत्यांना पाठवलेल्या पत्रांमध्ये आयातशुल्क वाढीबाबत माहिती देण्यात आली आहे.

**<u>महिला-क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंड महिला क्रिकेट संघांदरम्यान ब्रिटनमध्ये काल झालेल्या मर्यादित 20 षटकांच्या चौथ्या सामन्यात, भारतीय संघाने यजमान इंग्लंडचा सहा गडी राखून पराभव केला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत 3-1 अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं 20 षटकांत 7 बाद 126 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, भारतीय महिलांनी केवळ 17 षटकांत चार गडी गमावून लक्ष्य पूर्ण केले, सलामीवीर स्मृती मानधनाने 32 धावा आणि शफाली वर्माने 31 धावांचे योगदान दिलं.

**<u>क्रिकेट</u>**

एजबॅस्टन कसोटीतील ऐतिहासिक विजयानंतर ऊर्जावान झालेला भारतीय संघ तिसऱ्या कसोटी सामन्यात आजपासून लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडसोबत लढणार आहे. जसप्रीत बुमराह या सामन्यात उतरणार आहे. पाच सामन्यांची ही मालिका सध्या 1-1 अशी बरोबरीत आहे.

**<u>विम्बल्डन टेनिस</u>**

लंडनमध्ये सुरु असलेल्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेत, सर्बियाच्या नोवाक जोकोविचने इटलीच्या फ्लॅव्हियो कोबोलीविरुद्ध लढत जिंकून पुरुष एकेरीच्या विक्रमी 14 व्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. जोकोविचचा सामना उपांत्य फेरीत इटलीच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या जॅनिक सिन्नरशी होईल. महिला एकेरीत, जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या इगा स्विटेकने 19व्या मानांकित लिउडमिला सॅमसोनोव्हा हिचा 6-2, 7-5 असा पराभव करून तिची पहिली विम्बल्डन उपांत्य फेरी गाठली.

**<u>हवामान</u>**

मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि विदर्भात पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. जम्मू आणि काश्मिर, पंजाब, हरियाणा, चंदिगड, हिमाचल प्रदेश आणि उत्तरेकडील पु४व भागाला येत्या 15 तारखेपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसंच केरळ आणि कर्नाटकच्या किनारी भागात जोरदार पावसाचा अंदाज आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार